नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

# प्रेस नोट

दिनांक 30/09/2020 (बुधवार)
(सकाळ)

---

## चोरी

पो.स्टे. एमआयडीसी बोरी :– अंतर्गत 2 कि.मी. इंडोरामा गेट क्र. 2, समोर येथे दिनांक 27/09/2020 चे 22.00 वा. ते दिनांक 28/09/2020 चे 06.00 वा. फिर्यादी नामे– प्रकाश पार्श्वनाथ बाला, वय 97 वर्ष, रा. इंडोरामा गेट क्र. 2 समोर यांच्या झोपडीला लावलेल्या विटा अज्ञात आरोपीने बाजुला करून झोपडीत प्रवेश केला. यानंतर आरोपीने कपडयाचे बॅगमध्ये ठेवलेले सोन्याचे दागीने किमती 29,800/–रू व नगदी 20,000/–रू असे एकूण कि. 49,800/–रू. चा मुद्देमाल चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. एमआयडीसी बोरी येथे आरोपीविरुध्द कलम 380 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास सफौ अशोक तरमळे 9923699185 हे करीत आहे.

## रेती चोरी करणाऱ्या आरोपीला अटक

पो.स्टे. अरोली :– अंतर्गत रामटेक ते भंडारा रोड (भांडेवाडी फाटा) येथे दिनांक 29/09/2020 चे 07.15 वा. दरम्यान एमच–40/एले–3245 क्रमांकाच्या ट्रॅक्टर व ट्रालीचा चालक आरोपी नामे– विकास कोठीराम रामरीत, वय 45 वर्ष, रा. अरोली यांने त्याच्या ताब्यातील वाहनात विनापरवाना अवैधरित्या 1 ब्रास रेती किं. 2,000/– रू. रेती भरून वाहतुक करतांना मिळुन आला. वाहनासह एकुण 4,02,000/–रुपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.

सदर प्रकरणी सर तर्फे पोलिस शिपाई क्रिष्णा नागोसे, पो. स्टे. अरोली यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. अरोली येथे आरोपीविरुध्द कलम 379 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीला अटक करण्यात आली आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोहवा टिकाराम जाधव हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर